# प्रेसनोट ता.२७/०२/२०१९

## भिक मागण्यासाठी अपहरण केलेल्या ३ वर्षाच्या मुलाची कोंढवा पोलीस ठाणेच्या तपास पथकाने सुखरूप सुटका करून अपहरण करणाऱ्या एक पुरूष व महिला आरोपीस केले जेरबंद.

मा. डॉ. के. व्यंकटेशम सो, पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी पुण्याचा पोलीस आयुक्त पदाचा कार्यभार स्विकारलेनंतर अनेक नवनवीन योजना राबवून पुणेकर नागरिकांचे जीवन सुरक्षीत आणि सुखकर करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातीलच एक अभियान हे शहरातील चौकांमध्ये भिक मागणारे भिकारी यांचेविरुध्द सुध्दा राबवून शहर भिकारीमुक्त करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. यापार्श्वभुमीवर भिकारी आता पुण्याचे बाहेर जात आहेत. भिक मागण्याकरीता लहान मुलांचा सुध्दा उपयोग होत असल्याने अशा मुलांचे पालकांवर देखिल कारवाई करण्यात आली व ऑपरेशन मुस्कान राबवून अपहृत बालकांचा शोध घेवून त्यांची भेट त्यांचे पालकांशी करून देण्यात आली.

दि.२४/०२/२०१९ रोजी सांयकाळी ०५.४० वा.चे सुमारास तक्रारदार नामे श्री गोंविद पांडुरंग आडे, वय-२६ वर्षे, धंदा- मजुरी रा. आईमाता मंदिरा शेजारी, शालीमार सोसायटीजवळ, कोंढवा पुणे मो.नं.९१५६१७६९३८ यांनी त्यांचा मुलगा नामे अविनाश आडे, वय-३वर्षे ६ महिने, हा शालीमार सोसायटीजवळ कोंढवा बु. पुणे येथे खेळत असताना, त्यास कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या कायदेशिर रखवालीतून फुस लावून पळवून नेले, म्हणुन कोंढवा पोलीस ठाणे गु.र.नं.१८३/२०१९ भादंवि क. ३६३ प्रमाणे गुन्हा नोद करण्यात आला आहे.

सदर गुन्हा दाखल झालेनंतर पोलीसांना तपासाकरीता कोणताच दुवा उपलब्ध नव्हता. अपहृत बालकाचे आई वडींलाची सांपत्तीक स्थिती पाहता खंडणीसाठी सदर गुन्हा झाला असण्याची शक्यता अजिबात नव्हती. मुलाचे आई वडीलांचे कोणाशी वैर नव्हते. या शक्यता संपल्यानंतर मुलाचे अपहरण भिक मागण्याचे उद्देशाने झाले असावे,अशा निष्कर्षा पर्यंत पोलीस आले व त्यांनी धडाडीने तपास सुरू केला. कोंढवा, मार्केटयार्ड, स्वारगेट, शिवाजीनगर रेल्वे स्टेशन, कॅम्प, वानवडी, हडपसर, पुणे रेल्वे स्टेशन असा आजुबाजूचा सर्व परिसर पिंजून काढण्यात आला व मार्गावरील तब्बल ११० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची बारकाईने पाहणी करण्यात आली. त्यात एका ठिकाणी एक महिला व पुरुष एका लहान मुलाला घेवून जात असल्याचे चित्र प्राप्त झाले, परंतु त्यांची ओळख पटली नव्हती,त्यामुळे पोलीसांनी सर्वप्रथम अत्यंत चिकाटीने तपास करून आरोपीतांची ओळख पटविली व त्यानंतर तपासाने खरा वेग घेतला. अपहृत मुलगा सुखरूप परत पालकांना मिळवून द्यायचा या एकाच ध्यासाने कोंढवा पोलीस ठाण्याचे तपास पथक कामाला लागले व आरोपींचा माग काढत सासवड पर्यंत पोहचले. सासवड येथे गेल्यावर सदरचे आरोपी हे वीर गांव ता. पुरदंर, जि.पुणे येथे गेल्याची माहिती प्राप्त झाली. त्या अनुषंगाने तपास पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी हे मध्यरात्री वीर या गावी गेले तेथे श्रीनाथ मस्कोबा देवाची यात्रा चालू असल्याने त्या ठिकाणी लांखो भावीकांची गर्दी होती, त्या गर्दीमध्ये पोलीस स्टापने रात्रभर स्थानिक पोलीसांचे मदतीने सर्च ऑपरेशन राबवून आरोपीचा व अपहृत केलेल्या मुलाचा शोध घेत असताना, आज दि.२७/०२/२०१९ रोजी सकाळी ८.१५ वा. चे सुमारास एका लहाण मुलास कापडामध्ये गुडांळुन झोपडीचे बाजूला झुडपात प्राप्त सीसीटीव्ही फुटेजमधील संशयीत आरोपी लपून घेवून बसलेले दिसताच त्यांना तपास पथकातील स्टापने झडप घालून शिताफीने आरोपी नामे लाला शिवाजी सुर्यवंशी, वय-३८वर्षे, इंदिरा वसाहत औंध पुणे-६ मुळगांव मु.नंदगांव, ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद व महिला नामे सुनिता लक्ष्मण बिनावत वय-३० वर्षे, रा. सदर यांना अपहृत बालकासह ताब्यात घेतले व अपहृत बालकाची सुरक्षीत व सुखरुप सुटका केली.

सदर आरोपीकडे पोलीस ठाणे येथे आणुन सखोल तपास करता ते भिक मागुन स्वतःचा उदरनिर्वाह करतात. भिक मागते वेळी लहान बाळ जवळ असल्यास जास्त भिक मिळते त्यामुळे त्यांनी त्या बालकाचे भिक

Pune Police

मागण्याचे हेतूनेच अपहरण केल्याचे तपासात सांगितले आहे. त्यांनी यापुर्वी अशी काही मुले चोरली आहे काय? याबाबत अधिक तपास सुरू आहे.

गुन्हयाचा तपास करीत असताना सीसीटीव्ही कॅमेऱ्याची पोलीसांनी महत्वपुर्ण मदत होत असल्याने मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांनी सहकार्यातून सुरक्षेकडे या संकल्पने अंतर्गत "थर्ड आय" हा उपक्रम सुरू केला असुन, त्यांअतंर्गत पुणे शहरातील मार्गावरील, चौकातील सर्व खाजगी आस्थापना, संस्था यांनी रस्ते, चौक असे दर्शनी भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे असे अवाहन याव्दारे करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. सुनिल फुलारी सो, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर, मा. श्री.प्रकाश गायकवाड सो. पोलीस उप आयुक्त परिमंडळ – ५,पुणे शहर, मा. श्री. मिलींद पाटील सो.सहा पोलीस आयुक्त,वानवडी विभाग पुणे शहर, श्री.अनिल पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. महादेव कुंभार पोलीस निरीक्षक,गुन्हे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक चेतन मोरे, नितीन बोधे, पोलीस उप निरी.संतोष शिंदे, पो.हवा.राजस शेख, इकबाल शेख, पोना सुशिल धिवार, योगेश कुंभार, संजिव कळंबे, जयंत चव्हाण, अमित साळुंके, सागर सुर्यवंशी, पृथ्वीराज पांडुळे, निलेश वणवे, सचिन कळसाईत, पोशि. किरण मोरे, उमाकांत स्वामी, किशोर वळे, अमित बधे यांचे पथकाने केलेली आहे.

(महादेव कुंभार)
पोलीस निरीक्षक,गुन्हे
कोंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर


पुणे शहर पोलीस आयुक्तालय